*खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे*

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर

*मराठी विभाग आयोजित*

## मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन कार्यक्रम अहवाल

### दि. ११ ऑगस्ट २०१६

दर्जेदार साहित्य वाचनाने माणसाचे अनुभवविश्व समृद्ध होत असून खऱ्या अर्थाने साहित्य आपल्याला जगायला शिकविणे, नवी दृष्टी देते त्यासाठी विद्यार्थ्यांनी साहित्याचे अंतरंग समजून घेऊन वाचन करायला हवे असे आवाहन पद्ममणि जैन महाविद्यालयाचे प्रा. डॉ. हनुमंत भवारी यांनी केले ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाच्या उदघाटन प्रसंगी झालेल्या कार्यक्रमात (दि. ११) मराठी साहित्याभास व संधी ' या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ एस बी पाटील होते. या प्रसंगी मराठी विभाग प्रमुख डॉ. बी. डी. अनुसे, मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ संजय शिंदे , प्रा. किरण गाढवे, प्रा. वर्षा कांबळे आणि पदवी स्तरावरील मराठीचे अध्ययन करणारे विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. भवारी पुढे म्हणाले की , प्राध्यापकांनी अध्यापन करताना स्पष्टीकरणापेक्षा विध्यार्थ्यांची बोधन प्रक्रिया , कल्पकता विकसित करण्याकडे लक्ष द्यायला हवे. विद्यार्थ्यांनी स्कोप हा विषयाला नसून त्याचा अभ्यास करणाऱ्या व्यक्तीला असतो हे ध्यानात ठेवायला हवे. मराठी विषयाच्या अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना सूत्रसंचालक, निवेदक, मुद्रितशोधक, पटकथालेखक, व्याख्याता, पत्रकारिता, शिक्षक अशा अनेक क्षेत्रात संधी असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ संजय शिंदे यांनी मराठी भाषेसमोरील आव्हाने आणि मराठीतील करियरच्या संधी आदि विषयांवर विध्यार्थ्यांना सजग करण्यात येणार असल्याचे सांगितले.

डॉ. बी.डी,अनुसे

मराठी विभाग प्रमुख




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना
डॉ. हनुमंत भवारी




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना
डॉ. हनुमंत भवारी, सोबत प्राचार्य डॉ. एस.बी.पाटील



पुण्य नगरी | 4 | Pimpri Rural NEWS

गुरुवार, १५ सप्टेंबर २०१६ । पुणे

# साहित्याचे अंतरंग समजून विद्यार्थ्यांनी वाचन करावे

## प्रा. डॉ. हनुमंत भवारी : राजगुरूनगरला मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

। चाकण । प्रतिनिधी

दर्जेदार साहित्य वाचनाने माणसाचे अनुभवविश्व समृद्ध होते. त्यामुळे साहित्य हे खऱ्या अर्थाने आपल्याला जगायला शिकविते, नवी दृष्टी देते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी साहित्याचे अंतरंग समजून घेऊन वाचन करायला हवे, असे प्रतिपादन पद्मणी जैन महाविद्यालयाचे प्रा. डॉ. हनुमंत भवारी यांनी येथे केले.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी 'मराठी साहित्याभ्यास व संधी' या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

राजगुरूनगर । हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. हनुमंत भवारी.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील होते. मराठी विभागप्रमुख डॉ. बी. डी. अनुसे, मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. संजय शिंदे, प्रा. किरण गाढवे, प्रा. वर्षा कांबळे आणि पदवीस्तरावरील मराठीचे अध्ययन करणारे विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

डॉ. भवारी पुढे म्हणाले, प्राध्यापकांनी अध्यापन करताना स्पष्टीकरणापेक्षा विद्यार्थ्यांची बोधनप्रक्रिया, कल्पकता विकसित करण्याकडे लक्ष द्यायला हवे. विषयापेक्षा त्याचा अभ्यास करणाऱ्या व्यक्तीला स्कोप असतो हे विद्यार्थ्यांनी ध्यानात ठेवायला हवे. मराठी विषयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना सूत्रसंचालक, निवेदक, मुद्रितशोधक, पटकथा लेखक, व्याख्याता, पत्रकारिता, शिक्षक अशा अनेक क्षेत्रांत संधी असल्याचे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना वाचनसंस्कार रुजविण्याचे आवाहन केले. मराठी वाङ्मय मंडळ प्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी "मराठी भाषेसमोरील आव्हाने आणि मराठीतील करिअरच्या संधी" आदी विषयांवर विद्यार्थ्यांना सजग करण्यात येणार असल्याचे सांगितले.

वृत्तपत्रातील प्रसिद्धी